# पाखरां



# पाखरां

वयम्

आपल्या विकासाची आपली चळवळ

प्रकाशक

वयम्

लोकशाही जागर केन्द्र,
जांभूळ विहीर पूर्व
जव्हार, जि. पालघर ४०१ ६०३
फोन - २५२०-२९५११०

डिझाईन : नितीन बिल्दीकर,
नाशिक फोन : ९२२५१९३२६१

पक्षी फोटो : इंटरनेटवरून साभार

मुद्रण : देवगीरी ऑफसेट, नाशिक

अर्थसहाय्य : विप्रो सस्टेनेबिलिटी एज्युकेशन प्रोग्रॅम

प्रकाशन दिनांक- ८ एप्रिल २०२२

देणगी मूल्य - १००/- रु

© सर्व हक्क प्रकाशकाधीन

# प्रस्तावना

वयम् चळवळीने जव्हार तालुक्यातल्या जयेश्वर गावातील इ.७ वी व ८वी त शिकणाऱ्या काही मुलांसोबत पक्षी अभ्यासप्रकल्प केला. त्यासाठी शाळेने व शिक्षकांनी चांगले सहकार्य केले. या प्रक्रियेचे फलित असे हे पुस्तक.

या पुस्तकात मुलांनी त्यांना माहीत असणारी पक्ष्यांची माहिती विशिष्ट प्रकारे संकलित केली आहे. हा प्रकल्प कसा कसा घडला ती प्रक्रियाही आम्ही त्याला जोडली आहे. त्या अनुभवातून अशा प्रकारचे प्रकल्प करू इच्छिणाऱ्यांना या प्रक्रियेपासून पुढे जाता येईल, एवढाच आमचा हेतू आहे. मुलांनी लिहिलेली माहिती त्यांच्या वर्षानुवर्षांच्या अनुभवातली आहे. तिची सत्यासत्यता पडताळण्याचा आम्ही प्रयत्न केलेला नाही. तो या पुस्तकाचा उद्देश नाही. ही मुले ज्या जीवनशैलीत जगत आहेत, त्यामुळे मुलांना सहज माहीत असणारे अनेक विषय आहेत. शाळेबाहेर थांबलेल्या या विषयांना अभ्यासविषय करण्याचा हा प्रयत्न आहे.

पक्षी हा निसर्गप्रेमींसाठी अतिशय लाडका विषय. शहरी माणूस पक्ष्याकंडे निव्वळ कुतुहल आणि सौंदर्यदृष्टीने पाहतो. पक्ष्यांच्या शिकारीचे अनुभव वाचताना कदाचित नकोसे वाटतील. चुकीचे वाटतील. अशावेळी या मुलांच्या जागी स्वतःला ठेवून पाहिल्यास त्याच गोष्टी वेगळ्या दिसतील. योग्य-अयोग्य च्या पलीकडे मग आपल्याला जाता येईल.

ही एका वेगळ्या जगाची खिडकी आहे. असं बघण्याचा प्रयत्न केला तर शिकण्या-शिकवण्यात येणाऱ्या काही अडचणींवर कदाचित उत्तर मिळेल.

# मनोगत

मागच्या वर्षीची गोष्ट. काही गावात आम्ही जंगलफेरी आखली होती. जंगल फेरी म्हणजे मुलांसोबत शहरातल्या पाहुण्यांनी मस्त हिंडायचं, खायचं, पोहायचं आणि त्यांच्या तोंडून रानातल्या गमतीजमती ऐकायच्या. तर हे घडलं चामीलपाड्यात.

चामीलपाड्यातल्या मुलांसोबत आम्ही नदीवर गेलो. जंगलफेरीसाठी मुंबई वरून वनस्पतीशास्त्र, प्राणीशास्त्र यांचा अभ्यास करणारे दोन मित्र-मैत्रिणी आले होते. चामीलपाड्यातल्या मुलांनी त्यांना पक्ष्यांबद्दल, झाडांबद्दल बरंच काही सांगितलं. कित्येक तरी गोष्टी त्या दोघांना मुलांकडून नव्यानेच कळत होत्या, त्यामुळं दोघेही खुश होते. असंच हिंडता हिंडता चामीलपाड्यातल्या मुलांनी पक्ष्याची शिकार केली. त्यांना तो पक्षी चुलीवर भाजून खायचा होता. त्यांच्यासाठी ते नेहमीचंच वागणं होतं. मुंबईहून आलेल्या मित्रांसाठी मात्र ते धक्कादायक होतं. त्यात तो पक्षी होता 'चातक'. चातक हा पक्षी Endangered Species मधला. म्हणजे आधीच पक्षीप्रेमी असलेल्या आमच्या मित्रांची स्थिती अधिकच केविलवाणी झाली. दुस-या बाजूला मुलांना यातल्या गांभीर्याची जाणीव करून देणं तारेवरच्या कसरतीसारखं. मग चातकाची माहिती त्यांनी मुलांना सांगितली. तो आफ्रिकेतून, समुद्र ओलांडून फक्त पावसाळ्यात येतो.

पण चामीलपाड्यातल्या मुलांना आफ्रिका काय हेच माहीत नव्हतं. आणि त्यांनी तर आत्तापर्यंत समुद्रही पाहिला नव्हता. ते कधीही गावाबाहेर, कशासाठी पडलेच नव्हते. त्यामुळे हा पक्षी का मारून खाऊ नये याचं पटणारं उत्तर त्यांना मिळत नव्हतं. आमच्या मित्रांसाठी पक्ष्यांना न मारणं ही इतकी स्वाभाविक बाब होती की त्यात पटवण्यासारखं काय आहे, हेच त्यांना कळत नव्हतं.

हा प्रसंग मला फारच अंतर्मुख करून गेला. काय करणं योग्य आणि काय अयोग्य हे मुलांना सांगता आलं असतं, पटवताही आलं असतं...पण मलाच ते पटलं नसतं. शिवाय तिथल्या तिथे हा शिक्का मारला असता तर त्याचा परिणाम वेगळाच झाला असता.

मुलांबरोबर काम करताना अभ्यासाच्या वाटेनंच मतं तयार करण्याचा आग्रह धरण्याचं वळण मला पडलं ते अशा प्रसंगांतूनच. आपण अभ्यास म्हणून मांडतो तेव्हा ते जसं समोर असेल, जे हाताशी लागेल तसंच्या तसं पहावं आणि मांडावं लागतं. त्यात कुठेही आपली मतं आड येत नाहीत ना ह्याची काटेकोरपणे काळजी घ्यावी लागते. एखादा तुकडा नको म्हणून टाकून देता येत नाही, त्याच्यासकटच ते मिश्रण असतं. काही मतं तयार होणार असतीलच तर ती आपण केलेल्या अभ्यासाद्वारे व्हावीत. त्यांचा त्यांनी अभ्यास करण्यातून ही जाणीव येणं योग्य ठरतं.. त्यांचं काय म्हणणं आहे हे ऐकून घेऊया का... त्यांच्या निरीक्षणात त्यांना अजून खोलात कसं जाता येईल? शिकार वाईट, पक्षी पकडून भुजून खाणं वाईट इथूनच सुरूवात केली तर संवाद सुरू व्हायच्या आधीच संपेल.

अशा प्रसंगी त्यांच्या पाहण्याला निरीक्षणात बदलणं, निरीक्षणांना एका मोठ्या चित्राची जोड देणं, अनेक प्रश्न उपस्थित करून कृतीला अभ्यासणं आणि नव्या जाणीवा तयार होण्यापर्यंतचा टप्पा येणं हा प्रवास एक मोठा पल्ला आहे. कृतीकडे वळणे तर त्याही पलीकडचे. त्याची ही केवळ सुरुवात. यातूनच आम्ही पक्षी प्रकल्पासारखे विषय आखले.

हे प्रकल्प मुला-मुलींच्या भवतालाशी निगडीत आहेत. हे विषयही शाळेच्या चौकटीत आणून त्यालाही अभ्यास म्हणून पाहता येऊ शकतं...आपण करत असलेल्या गोष्टी, त्याचा परिणाम, जगात काय घडतंय, विविध घटनांचा एकमेकांशी काय संबंध आहे, कसा संबंध आहे यांचं आकलन व्हायला मग हाताशी काहीतरी साधन मिळतं,.माध्यम मिळतं. हे माध्यम आपल्या ओळखीचं, सवयीचं असलं की ह्या प्रक्रियेला वेग येतो. त्यातून अधिक चांगलं व्यक्त होता येतं...

मला हा विषय नवीन होता, पण मुलांच्या निमित्ताने तो कळतोय. पक्ष्यांविषयीची त्यांची निरीक्षणं ऐकून थक्क व्हायला होतं. ते ज्या सहजतेने घडाघडा एखाद पक्ष्याविषयी सांगतात, (अगदी ९ वर्षाची पोरंही) तेव्हा ती चमक पाहून त्यांच्यात एक वेगळीच जादू असल्यासारखी वाटते...मग हीच चमक इतर वेळी कुठे गायब होते? शाळेच्या भिंतीत दिसून येत नाही की त्यांना कुणी कधी त्यांच्या(जगा)विषयी न विचारल्याने हरवून जाते...? मुलांकडे भांडार आहे` जंगल, रानभाज्या, फळं, मासे, पक्षी..असं बरंच काही.. फक्त त्यांच्याकडचं कुणीतरी ऐकणारं हवं.. मुलं खुलतात, बोलतात....याविषयी, त्यांच्याविषयी आपुलकीनं विचारलं की... मुलांचे हे विषय शाळेच्या कट्ट्यावर, वर्गात आणून मुलांमधली शोधक नजर, कुतूहल कसं टिकून राहील?

ही मुलं बिनधास्त जंगलात हिंडतात, डोहात उंबरावरून उड्या मारतात, पोहायला आपसूकच शिकतात. झाडांवर सरसर चढतात...डोंगरात आपापलीच वाट शोधतात...एखाद्या भागात, तिथल्या मुलांबरोबर काम करायचं तर त्यांचा भाग, त्यांचं जग समजून घ्यायला हवं, इतकाच काय तो व्यवहार्य हेतू नाही. तर त्याही पलीकडे जाऊन त्यात काहीतरी आहे.. यांच्यात एक मुक्तपणा आहे, उस्फूर्तता आहे, निरूद्देश पाहणं, जगणं आहे. हे खुणावतं...त्याविषयी आकर्षण वाटतं... य प्रकल्पाच्या निमित्ताने हे सगळं पाहता आलं, हाच मला मिळालेला मोठा खजाना !

जयश्री कुलकर्णी

## प्रकल्प असा झाला...

गावातली मुलं वाढतात ती परिसरातील हर एक गोष्टीचा हात धरून. अगदीच रांगती वर्षं सोडली तर आईबापाकडे प्रत्येक क्षणाला पोराचा हात धरण्यासाठी न वेळ असतो न तशी गरज. पोरांच्या आसपास अफाट पसरलेलं जग असतं. त्यात अंगणातली माती असते. आजुबाजूची झाडं असतात. रंगीबेरंगी पक्षी असतात. गोठ्यातली जनावरं असतात. ऋतुंमधले बदल असतात. सुगी संपताना फुलांवर हिंडणारी नाना रंगांची पिस्कुटं असतात. पावसाळ्यातले किडेमकोडे अळ्या असतात. इतर पोरांशी होणारी भांडणं असतात.

हे सर्व पाहताना त्यातील वैविध्याची, बदलांची स्पष्ट जाणीव नसली तरी नकळत त्यांची मेंदूत साठवण होतच असते. त्यात अनेक वर्षांच्या अनुभवांची भर पडते. हळूहळू मोठी होताना मुलं परिसराशी अधिक जोडली जातात. आता ती फक्त पाहणा-याच्या भूमिकेत नसतात. गुरं चारताना, नदीवर पोहताना, कपडे धुताना, सरपण आणताना, रानातून येताना वाटेवर उगवलेली भाजी आणताना त्यांनी हे बदल जवळून पाहिलेले असतात. जाता जाता दिसलेल्या असंख्य गोष्टी मनात पडून राहिलेल्या असतात. या पाहण्याला निरीक्षणाचे रूप येताना फारसे दिसत नाही कारण त्यामागे काही हेतूच नसतो. हेतूची जोड मिळाली तर जाता जाता दिसलेल्या गोष्टींची निरीक्षणेही होऊ शकतात.

कधीकधी ज्याच्या सोबत पोरं हिंडतात तो जोडीदार थोडा मोठा असतो. फिरता फिरता तो काही गोष्टी सांगतो. कधीकधी बाबाबरोबर हिंडताना पोरांना रान माहीत होतं. कधीकधी संध्याकाळच्या वेळी अंगणात आजोबालोक एकमेकांसोबत गोष्टी करत बसतात. ते कानांनी टिपलेलं असतं. रानात जगण्यासाठीच्या नाना गोष्टी करत हिंडताना या गोष्टीच वापरलेल्या असतात. या गोष्टी कुणा एकाच्या पाहण्याऐकण्यातून तयार होत नाहीत. पोरांना माहीत असलेल्या गोष्टी समाजाच्या सामूहिक ज्ञानाचाच एक भाग असतात.जसं झाडाला अनेक फांद्या आपसूक फुटत जातात. तशीच ही वाढ. अत्यंत नैसर्गिक रित्या आणि अर्थातच अत्यंत संथपणे होणारी.

मुलांचं हे अशापद्धतीने वाढणं पुस्तकांच्या वाटेनं शिकण्याच्या अधेमधे येत नाही. ही दोन्ही विश्वं परस्परांना छेदत नाहीत. १०-१२ वर्षांची होईपर्यंत मुलांनी परिसराबद्दल जे काही समजून घेतलं आहे, जगण्याशी संबंधित गोष्टी शिकून घेतल्या आहेत त्यांचा कुठेच रुढ शिक्षणात संदर्भ न येणं आम्हाला खटकत होतं. यालाच अभ्यासक्रमात आणता आलं तर ?

तर आत्ता माहितीच्या पायरीला थांबलेलं शिक्षण अधिक खोल जाऊ शकेल. आत्ता पाठ्यपुस्तकातून शिकत असलेले विषय ग्रामीण मुलांना परके वाटत असतात. ती माहिती समजून घेणे अनेक कारणांनी कठीण जात असताना माहितीवर प्रक्रिया करण्याच्या कौशल्यापर्यंत पोचणे तर दुरापास्तच. माहितीवर प्रक्रिया करणे म्हणजेच मुलांचे आकलन वाढणे, विविध बाबींची तुलना करता येणे, अर्थ लावता येणे, विसंगती समजणे, फरक शोधता येणे, माहितीचा उपयोग करता येणे, मुद्यांमधील संगती शोधताना तर्क लावता येणे, अशा विचारप्रक्रियेतून जाऊन समस्या सोडवता येणे या सर्व क्षमता मुलांमध्ये येणे. खरंतर हेच अभ्यासक्रमाचे उद्दिष्ट. परंतु १२-१३ वर्षांची एरवी समज आलेली मुलं जेव्हा लिहिण्यावाचण्याच्या मूलभूत कौशल्यांच्या पायरीलाच अडखळून थांबतात तेव्हा त्यांच्या विचार करण्याच्या क्षमताही त्याच पायरीला आहेत असे मानायचे का ?

या विसंगतीमुळेच शिकण्यात रस न वाटून शिक्षणाकडे पाठ फिरवलेली मुलं आपल्याला दिसतात. कित्येकदा मुले प्रवाहात असलेली भासतात, पण शिक्षण प्रक्रियेचा हेतूच हरवल्याने आत्मविश्वास हरवलेली फौज आपल्या समोर दिसत असते. अशावेळी विचारकौशल्यांना गती देण्यासाठी, मुलांना माहीतच असल्याने सोप्या वाटणाऱ्या विषयांपासून सुरुवात करता येईल का ? त्यांना माहितीच्या असणाऱ्या गोष्टीच कशा मांडून पहायच्या याच्या विविध पद्धती शिकवता येतील का? अशा पद्धतीने मांडल्याने माहिती असणा-या विषयाचे आकलन-खोली वाढते का? माहिती असलेल्या मुद्यांचे बोट धरून माहिती नसलेल्या भागापर्यंत आपआपले पोचता येते का ? असे अनेक प्रश्न स्वतःपुढे ठेवत या अभ्यासप्रकल्पांना आम्ही हात घातला.

सुरुवात करताना मुलांचं आजवरचं जग काय आहे याची शोधाशोध करायला घेतली. त्यातूनच ज्याला आपण ढोबळपणे परिसर किंवा कधीकधी निसर्ग म्हणतो त्यातले अनेक धागे सुट्टे दिसू लागले. अभ्यासविषय म्हणून त्याला किती अर्थ आहे, हे शोधताना वर्षभरात सहा शाळांबरोबर सहा प्रकल्प आकाराला आले. त्यात पक्षी आहेत. रानात मिळणाया भाज्या आहेत. शेतीची-शिकारीची-मासेमारीची साधनं आहेत. खेळ आहेत. अनोळखी व्यक्तीला जंगल फिरवण्याच्या वाटा आहेत



रानभाज्या प्रकल्प, रामखिंड - जंगलाचा परिघ फिरताना



साधने प्रकल्प, बोराळा - मोबाइल स्टॅण्ड बनवताना



खेळ प्रकल्प, पाथर्डी - स्थानिक खेळाचे व्हिडीओ बनवताना

## इकडून तिकडून सगळीकडून

यासर्व विषयात मुलांना असणारी माहिती एकत्र आणणं हा अभ्यासाची पहिली पायरी. माहितीचा आकार किती मोठा आहे आणि तो तथ्यांच्या पलिकडेही शोधायला हवा, हे आम्हाला जाणवून देणारा हा टप्पा. पक्षी पाहत-पकडत आणि खातच इतकी वर्षं वाढलेल्या आमच्या पोरांसाठी ही सुरुवात सोपी होती. आपल्याला माहीत असणाऱ्या पक्ष्यांची नावं लिहायला घेऊ म्हणून एकदा सुरुवात झाली आणि जे पटपट आठवत होतं तिथं येऊन गाडी थांबली.



पक्षी प्रकल्प, कासटवाडी - माईंड मॅप मांडताना

आता अजून खोलात जाण्यासाठी यादीबरोबर आठवणी जोडल्या. कुठला पक्षी आवडतो. तो का आवडतो. कोणता पक्षी का आवडत नाही. कोणता पक्षी कुठे दिसतो. हे मांडण्यासाठी माईंड मॅपची रचना उपयोगी पडली. विचार करताना सुरुवातीलाच एकच सूत्र दिलं की शोधाशोधीला मर्यादा पडू शकतात. कुठेही भरकटण्याची सोय असेल तर अनेकांना त्या रचनेत आपली माहिती - अनुभव - मत बसवता येते. आता फळ्यावर डोक्यात पूर्वीपासून दडून असलेल्या अनेक गोष्टी उतरल्या.

आता हाताशी माहितीही होती आणि अनुभवही होते. गोष्टीही होत्या. पहिल्यांदा मग गोष्टीच लिहायचं ठरवलं. 'काय लिहू हा प्रश्नच गैरलागू होता. 'कसं लिहू हाही प्रश्न फार गंभीर झाला नाही'.

" काकडकुंभाऱ्या नाय  आवडत खायला.. शीऽऽऽ.. तो शेलटा ना खातो.."

"रंगीत पाखरां मस्त दिसतात, त्याचे रंग पण हाताल नाही लागत" अशा गप्पा रंगत गेल्या आणि मग पुरेसं बोलून झाल्यावर त्या लिहायला घेतल्या.

हे लिखाण गटानं मिळून लिहिलेलं असलं तरी त्यात कुणा एकाचा अनुभव नाही. तसंच अनुभवांची अनेक ठिगळं जोडल्यानं येऊ शकतो तसा विस्कळीतपणाही नाही. लिखाणात अनुभवाची सलगता आहे.

## काही सांगण्यासाठी असते ती भाषा

बोली भाषेतले अनेक शब्द लिखाणात आहेत. मुलांशी गप्पा मारून त्या शब्दांना समजून घेता आलं. लिहिताना कोणते शब्द अजून स्पष्ट करायला हवेत हे मुलांपर्यंत पोचवता आलं. शब्द बरोबर कसे लिहायचे हेही या निमित्ताने सांगता येईल असं जाणवलं. भाषा संवादाचं माध्यम आहे. आपल्या मनातील विचार-भावना-अनुभव दुसऱ्यापर्यंत पोचवण्यासाठीचं माध्यम. मुलांना जे सांगायचं आहे ते त्यांना सांगायला चांगलं जमतंय असं मुलांच्या लिखाणातून दिसून आलं. मुलांची शैली चित्रमय आहे. जसं घडलं तसं डोळ्यासमोर उभं करणारं हे लिखाण आहे.

पक्ष्यांच्या गोष्टी लिहिताना त्यात स्वाभाविकपणे शिकारीच्याच गोष्टी जास्त होत्या. पक्ष्यांचा रंग आणि आकाराबरोबर त्याची चव कशी लागते ही माहिती रूढ मार्गाने कदाचित आली नसती. 'तुम्हाला वाटते ते लिहा' असं म्हटल्यावर योग्य- अयोग्यच्या गंडांचा संबंधही न येता मुलांनी पक्ष्यांना किती प्रकारे अनुभवलं आहे, हे वर आलं. भुकेसाठीची शिकार आणि गंमत म्हणून शिकार हे खरंतर दोन टोकाच्या गोष्टी. पण शहरी आधुनिक मानसिकता त्याकडे केवळ हत्या म्हणून बघते. त्यातून मग आपल्यापेक्षा वेगळ्या अनुभवांचे अर्थ लावणं कठीण होऊन बसतं. आपले अनुभव शिक्षणातून येणाऱ्या रूढ समजुतींशी जुळत नाहीत असे दिसले की वाढीच्या वयातील मुलं मनात नकळत अनुभवांची मोडतोड सुरू करतात. अशावेळी फक्त अनुभव व भाषाच नाही तर व्यक्तिमत्त्वावरही त्याचा परिणाम होतो.'जे आहे' यापेक्षा 'जसं असायला हवं' त्याकडे विचार जाऊ लागतात. हा प्रकार आत्मविश्वासाने उभे राहण्याच्या सातत्याने आड येतो.

कोणताही तयार दृष्टिकोन न दिल्याने मुलांच्या लिखाणात पारदर्शकता आलेली आम्हाला दिसली. 'होलीला चव राहते. तशी पोपटालाही चव राहते. पण पोपट दिसायलाही मस्त दिसतो' अशी अतिशय नितळ आणि सच्ची अभिव्यक्ती त्यातून दिसली.

मुलांकडे सांगण्यासारखं खूप आहे. मग भाषा साध्य म्हणून न वापरता साधन म्हणून वापरलं तर ? तर ऐकण्यासारख्या समजून घेण्यासारख्या अनेक गोष्टी वर येतील. या प्रवासात भाषा नामक साधनाला सुधारणे, हेसुद्धा मुलांसाठी अधिक अर्थपूर्ण होईल.

## गटानं मिळून... मुद्यांना धरून धरून...

अनुभव लेखनानंतर अभ्यासाची गाडी माहितीकडे वळली. पक्षी दिसतो कसा. राहतो कुठं. खातो काय. अशी माहिती भराभर येत होती. पण अर्थातच त्यात एक ठरावीक साचा नव्हता. मग आकार, रंग, कुठे दिसतो असे काही मुद्दे समोर ठेवले. त्यानंतर मुलांकडून येणारी माहिती आता अधिक सुसूत्रपणे येऊ लागली.

ही माहिती सर्वांच्याच अनुभवविश्वाचा भाग असल्याने गटात काम करणे मुलांना अतिशय सोपे जात होते. जसं रानात हिंडतो एकत्र, तसे शाळेत अभ्यासही एकत्र. हिंडताना-शिकार करताना कुणाला माग चांगला काढता येतो. कुणाला चिखाटी (झाडाचा चीक लावून तयार केलेला सापळा) चांगली लावता येते. तर कुणाला आवाज चांगला ऐकू येतो. आणि कुणाला या सर्वांच्या मागून चांगलं चालता येतं. गटात पक्ष्यांचा अभ्यास करतानाही अशीच क्षमतांची बेरीज होत होती. कुणाला चांगलं लिहिता येत होतं. कुणाला चांगलं आठवत होतं. कुणाला त्यात भर टाकायला जमत होतं. तर कुणाला माहिती देणारा योग्य पोरगा कोण, हे सुचत होतं.


अशी जवळपास पन्नासेक पक्ष्यांची माहिती लिहून झाल्यावर आता पुढच्या टप्प्यावर जायची वेळ झाली. त्यात आता नेमकेपणा आणण्याची गरज होती. पक्षी पाहण्यासाठी, शोधण्यासाठी संदर्भ पुस्तक वापरलं जातं. ही मुलांसाठी नवीन माहिती होती. त्यामुळे पुस्तक बघून ती हरखून गेली. त्यातले रंगीत फोटो बघत आपल्याकडे यातला कुठला पक्षी दिसतो, त्याचे पुस्तकातले नाव काय अशी उत्सुकता त्यांच्या पुस्तक हाताळण्यातून दिसत होती.

## शब्द शब्द शोधताना..

आता पुस्तक वाचून आपल्या माहितीत काही भर घालता येते का हे पाहण्याचा पुढचा टप्पा होता. पक्ष्यांचे आकार, रंग तर लिहून झाले होते. पण पुस्तक वाचल्यानंतर त्यात नेमकी भर कशी घालायची हे मुलांना समजत गेले. मग पाठीवरचा, मानेवरचा, पोटावरचा रंग वेगळा आहे का हे लक्षात घेऊन तशी भर घातली गेली. सनकन्हुरलाच्या पंखावर ठिपके असे आधी लिहून भागले होते. आता ठिपके बारीक की मोठे हा बारकावा टाकला गेला.




सनकन्हुरला जंगलात राहतो हे आपल्या माहितीत मुलांनी लिहिले होतेच. पण पुस्तकात वाचल्यावर तो 'दाट जंगलात' राहतो, ही नेमकी विशेषण भर मुलांच्या लक्षात येऊन त्यांनी घातली.



आपल्याला माहिती असणाऱ्या पक्ष्यांची पुस्तकातील माहिती वाचून मुलांनी प्रभावित होऊन त्यांनी आपली माहिती बाजूला ठेवली आणि तीच माहिती उतरवली असे झाले नाही, हे अजून विशेष. उलट काहीवेळेला त्यांनी पुस्तकातल्या माहितीत भर घातल्याचे उदाहरण घडले. पानशिव्या पक्षी घरटे कशाचे बांधतो, ही माहिती पुस्तकात आहे. पण तो घरटे कसे बांधतो, ही माहिती पुस्तकात नसल्याचे त्यांच्या लक्षात आले. अर्थातच ती भर संदर्भपुस्तकालाही पुढे नेणारी ठरली. हळदकुड्या शहरातल्या गजबजलेल्या ठिकाणाच्या झाडांवर राहतो, ही माहिती पुस्तकातली. पण तो आम्हाला कोडीच्या झाडावरच बहुतेकवेळा दिसतो. तेव्हा त्याचे राहण्याचे ठिकाण म्हणून कोडीच्या झाडावर असे आपल्या अनुभवातलेच लिहिणे मुलांनी पसंत केले.



हळदकुड्याच्या बाबतीच झालेला मजेदार किस्सा. दिलीप आणि युवराज दोघे एकाच गटातले. हळदकुड्या वडाच्या बिया खातो की पिंपळाच्या यावर त्यांची चांगलीच जुंपली. या प्रसंगी काही मुलं दिलीपच्या गटात तर काही युवराजच्या म्हणण्याला दुजोरा देणारे. आता निर्णय कुणी करायचा? पोरांना अचानक संदर्भपुस्तकाची आठवण झाली आणि त्यांनी पुस्तकाकडे धाव घेतली. हळदकुड्या दोन्ही खातो, असे पुस्तकात वाचल्यावर वाद मिटला आणि माहितीत दोन्ही खाद्यं घातली गेली.

पुस्तक प्रमाण भाषेत असल्याने त्यातील अनेक शब्द अडणार हे स्वाभाविकच होतं. पण त्यांचे अर्थ मुलांनी संदर्भाने लावले. भाषा अशीच तर शिकली जाते. वाढवली जाते. अमुक पक्षी किडे खातो. असे वर्णनतर त्यांनी लिहिले होते. पण लिहिताना त्याचे वर्णन 'खाद्य' या सदराखाली येईल, ही त्यांच्या साठी नवीन माहिती होती. कीटक, अळ्या असे वर्णन वाचून 'खाद्य' म्हणजे खाण्याशी संबंधित काहीतरी शब्द असणार, हा अर्थ त्यांनी लावला. तसेच 'छोट्या झाडात' असे म्हणण्याऐवजी 'झुडुपात' असेही म्हणता येईल, हाही शोध त्यांचाच.

काळीचूही पक्ष्याची चोच बाकदार असते. टोकदार असते. असे वर्णन करताना 'सुईसारखी चोच' असे एक नवीन विशेषण त्यांना मिळाले. आधी त्यांनी चोचीचे वर्णन करताना 'टिस्कोळी' हा स्थानिक शब्द वापरला होता. त्याऐवजी 'सुईसारखी' असे विशेषण वापरल्यास ते वाचकांना कळायला सोपे जाईल असा विचार करून त्यांनी आपला शब्द बदलला. मासे खाणा-या पक्ष्यांच्या चोची विशिष्ट प्रकारच्या असतात, हे वाचल्यावर त्यांनी परत एकदा पुस्तकातले फोटो शोधले. कावळा, बगळा, गरूड यांच्या चोचीत नेमका काय फरक आहे, हे समजून घेतले. अशाप्रकारचा बदल करण्यासाठी कोणतेही बोलणे न होता त्यांनी परस्पर हा बदल केला. भाषा हे संवादाचे साधन आहे, हे मुलांना आपसूक माहीत असल्याचा हा सज्जड पुरावा.




पक्ष्यांचे आवाज काढता येणं ही तर मुलांची खासियत आणि विरंगुळा. वर्गात आवाज काढण्याचा विषय निघाल्यावर मुलं सुटलीच. पक्ष्यांची माहिती लिहिताना त्यात पक्ष्यांचे विशिष्ट लक्षण म्हणून आवाज घालायला हवेत हे तर आधीही त्यांच्या लक्षात आलं. 'आवाज काढणं सोपं पण लिहिणं महाकठीण असं झालं'.

अशावेळी पुस्तकात मुलांनी टिपलं की सुतार पक्ष्याचा आवाज लिहिताना क्लिकररऽऽररऽऽ असं लिहिलं आहे. त्याआधारे मुलांनी इतर पक्ष्यांच्या माहितीतही आवाज शोधले. नाही मिळाले तिथे स्वतः आवाज काढून तो नाद शब्दात पकडण्याचा कौतुकास्पद प्रयत्न त्यांनी केला.

## राहणं आणि खाणं

पुस्तकामुळे मुलांचे लिखाण अधिक नेमके - मुद्देसूद होत गेलेच; पण त्यांना नव्या शब्दांबरोबर नव्या संकल्पना समजावण्यासही आपसूक सुरूवात करता आली. पक्षी कुठे दिसतो हे त्यांना माहीत होतेच. पुस्तकातून 'अधिवास ही व्यापक संकल्पना' त्यांच्या लक्षात आली. प्रत्येक पक्ष्याची आढळण्याची जागा आणि त्याचे खाद्य यात काहीतरी नाते आहे हे त्यांच्या लक्षात आले. आपल्या रानाच्या संदर्भापलीकडे गवताळ प्रदेश, दाट जंगल, माळरान, खाडी, पाणथळ जागा, वाळवंट, हिमालय अशी अनेक वस्तीस्थाने त्यांच्या चांगली लक्षात आली.

अधिवासावरून झालेल्या अनेक चर्चांमधून हे चांगले लक्षात येणे कळून आले. काही पक्षी बंधाऱ्यावर दिसतात. काही जंगलात, पाण्याच्या, खाड्यांच्या जवळ दिसतात. हे स्थानिक किंवा छोटे अधिवास तलाव, समुद्रकिनारे, पाणथळ जागा या मोठ्या अधिवासांचा एक भाग मानता येतील असे चर्चेतून निघाले. बगळा आपल्याकडे दिसतो पण पुस्तकात तर त्याचा अधिवास सागरी किनारे, खाड्या असा दिलेला होता. आपल्याकडे तर समुद्र नाही. आपण बैल चरायला नेतो. तिथे आपल्याला दिसतात बगळे. 'माळरान हाही बगळ्याचा अधिवास असेल ' यावर मुलांचे एकमत झाले.



वाळवंटात किंवा हिमालयातील टोकाच्या हवामान स्थिती बघता तिथे पक्ष्यांना काय खायला मिळत असेल, असा मुले अंदाज बांधत होती. खाद्य आणि अधिवासाचा तक्ता भरताना त्यांच्या आपापसात चर्चा झाल्या. 'वाळवंटात झाडं नाहीत. पाणी नाही तर पक्षीही नसतीलच. मासे खाणारे पक्षीतर नक्कीच नाही मिळणार.

पण पुस्तकात सांगतात की पक्षी आहेत तिथंही. मग अळ्या खाणारे असतील. किंवा मेलेलं खात असतील. गिधाडं, गरूड असतील. हिमालयात बर्फाशिवाय काय असेल?' कधीही न पाहिलेल्या 'भूप्रदेशांची' मुलं कल्पना करत होती. 'तिथे पर्वत आहे.' उंच झाडे आहेत. मग फळे असतील, तर फळे खाणारे पक्षीही असतीलच. या तर्कापर्यंत मुले पोचली. फुलांचा रस, किडे, मेलेले प्राणी हेही पक्ष्यांचे खाद्य असू शकेल, ही भर त्यांनी खाद्यप्रकारात आपली आपण घातली. ठरावीक पक्ष्यांचे अधिवास भारताच्या नकाशात शोधण्याचे सत्र असे रंगले. नकाशामुळे स्थानिक पातळीवरून विचाराची एकदम कक्षाच बदलली.

### अर्थाच्या खोलात

पक्ष्यांची बरीच माहिती वर्णनरूपात लिहिल्यानंतर आता थोडी वेगळं भिंगं लावून... पाहायला शिकवायचे होते. त्यांच्या माहितीतील मुद्यांच्या आधारे काही गट तयार केले. अळ्या-कीडे खाणारे पक्षी, धान्यावर येणारे पक्षी, ऋतुनुसार दिसणारे पक्षी, नेहमी दिसणारे - नेहमी न दिसणारे पक्षी, पाण्याजवळ राहणारे - जंगलात राहणारे पक्षी, आपण खात असलेले - खात नसलेले पक्षी. अशा तक्त्यात यादी विभागून झाली. त्यानंतरचा टप्पा होता त्याआधारे काही प्रश्न पडत आहेत का? या मांडणीमुळे काही प्रश्नांची उत्तरे देणं सोपं जात आहे का, ते पाहण्याचा.

करकोचा आपल्याकडे नेहमी दिसत नाहीत. येतात तसे एक दिवस गायब होतात. हे पक्षी आकाशात जात असताना त्याच्या खाली एखादं पोरगं रडलं तर मग काहीतरी घडणार असं लोकं सांगतात. मग देव वगैरे करतात. ह्या समजुतींचा हात धरून मग स्थलांतरित पक्ष्यांवर बोलता आलं. त्याची कारणं पाहता आली.

आपण खात असलेले पक्षी आणि धान्यावर येणारे पक्षी सारखे आहेत, हे तक्त्याच्या आधारे चटकन डोळ्यापुढे आलं. यात असलेला संबंध मग सहजच स्पष्ट झाला. जंगलात सापडणारे आणि कमी दिसणारे पक्षी यातला संबंधही विचार करण्यासारखा होता. जंगल कमी होत चाललं आहे, हे तक्त्यावरून सिद्ध करता येणं मुलांसाठी नवीन होतं.

## ओळखीच्या वाटेने अनोळखी जगाकडे

आपल्या जागी मिळणाऱ्या पक्ष्यांची नावं लिहू- मग माहिती लिहू इथपासून सुरू होऊन त्या माहितीची मांडणी, त्याचा अर्थ लावणे, संबंध शोधणे, संदर्भ साहित्याचा वापर करणे, आपल्या माहितीत योग्य ते बदल करणे इथपर्यंत पोचणं आणि त्यात मुलांना हळूहळू रस वाटत जाणं हेच हा प्रकल्पात होईल का, पहायचं होतं. माहिती असलेल्या एका तुकड्यापासून सुरूवात करून माहीत नसलेल्या एका मोठ्या चित्राला समजून घेतानाची प्रक्रिया बघायची होती. अशी सुरूवात केल्याने माहीत असलेल्या पासून अनोळखी बाबींपर्यंतचा प्रवास नेहमीच्या अभ्यासविषयापेक्षा रंजक होतो का, हे तपासायचं होतं. पुस्तक वाचताना काही वेळा कंटाळा आला तरी एकंदर सर्व सत्रांची मुलांनी आवडीने वाट पाहिली. प्रत्येकाचा सक्रीय सहभाग ही सुद्धा लक्षणीय बाब ठरली. वर्गातल्या मुलींना या विषयात फार भाग घेता न येणेही स्वाभाविक होते. मुलेच रानात जास्त हिंडतात, तेव्हा पक्ष्यांबद्दलची त्यांची माहिती सखोल असणे स्वाभाविकच होते.

वर्गात एरवी न बोलणाऱ्या आणि शाळा सोडून गेलेल्या मुलांनाही या प्रक्रियेत सहभागी होता आले. जेव्हा हा विषय सुरू झाला तेव्हा 'काय चालू आहे ' म्हणून खिडकीतून डोकावणारा मनिष त्याच्याही नकळत प्रकल्पात सहभागी झाला.

जेव्हा माहिती जमा करताना काही बाबीत एकमत होत नव्हतं, काहीबाबत खात्री नव्हती तेव्हा मुलांनी एकमतानं दिनेशचं नाव सुचवलं. दिनेशने शाळा सोडून फार वर्षं झालेली. पण 'रानात हा चांगला हिंडतो तेव्हा त्याला शंका विचारता येईल', असं सर्व मुलांनी उस्फूर्तपणे सुचवलं. शिक्षणव्यवस्थेच्या बाहेरील व्यक्तीला साधनव्यक्ती म्हणून स्थान मिळणं किती महत्वाचं आहे. हेही केवळ तशा जागा तयार केल्याने सहजच घडलं.

## इथून पुढे

याच्यानंतर या वाटेनं अजून खूप पुढं जाता येईल असं वाटणं, ही या प्रक्रियेतून हाताला लागलेली महत्वाची गोष्ट. यात रस असणारी काही मुलं काही निवडक पक्ष्यांचा अभ्यास अजून बराच खोलात नेऊ शकतील. त्यांची अजून वैशिष्ट्ये सातत्यपूर्ण आणि शास्त्रीय निरीक्षणातून तपासू शकतील. त्यांच्या विणीच्या हंगामाबाबतचे काही सूक्ष्म बदल टिपू शकतील. लोकांमध्ये पक्ष्यांबाबत असलेल्या समजुती, लोककथा आणि त्या पक्ष्याचे वर्तन, वैशिष्ट्य यांचा काही परस्पर संबंध दिसतो का हे तपासू शकतील. या भागात स्थलांतरित होणाया पक्ष्यांचा अभ्यास तुलनेनं कमी आहे. त्यात आपल्या निरीक्षणांची भर मुलं घालू शकतील.

यासाठी पुस्तकं, वेबसाईट्स, तज्ज्ञ व्यक्ती, स्थानिक व्यक्ती  यांचे संदर्भ कसे वापरायचे, हे शिकू शकतील. नोंदी अधिक बारकाईने, सातत्याने ठेवायला शिकतील. आणि मग या सगळ्याचा भाग म्हणून आपसूकच लिहाय-बोलाय-वाचायला शिकतील. हे सर्व करण्यासाठी त्यांच्या कडे सबळ हेतू असेल. म्हणून आत्ता रटाळ वाटणारे लिहिणे-वाचणे अर्थपूर्ण बनेल.

काही आठवड्यांच्या या प्रकल्पानं या वाटेनं पुढं जाता येईल हा आशावाद मनात जागवला. म्हणूनच शिकण्या-शिकवण्यात रस असणायांपर्यंत हे सर्व पोचवण्यासाठी हा पुस्तक प्रपंच !

दीपाली गोगटे



**स्थानिक नाव : बांडोळ्या**
**मराठी नाव : कोतवाल**
**इंग्रजी नाव : Black Drongo**

**ओळख :** बांडोळ्याचा रंग काळा असतो. आकार कावळ्यापेक्षा छोटा असतो. तेची चोच लांब आणि टिस्कोळी राहते. त्याची पिसेपण काळी असतात.

**खाद्य :** कीटक, कीडे, अळ्या खातो.

**कुठे राहतो/कुठे दिसतो:** बांडोळ्या सादडीचे झाडांवर राहतो. बांडोळा मसणवाटीच्या बाजूला झाड आहे तिथे दिसतो. मरलेल्या माणसाचा धूर असतो, तिथल्या धुराशी दिसतो. राब करतात तिथेपण दिसतो.

( भूज- भातशेतीसाठी शेण, पालापाचोळा जाळून जमीन तयार केली जाते. त्याला जमिनीची भूज करणे असे म्हणतात.)



(शेटल्या- सरडा)

**स्थानिक नाव : मोरघा**
**मराठी नाव : घार, ब्राम्हणी घार**
**इंग्रजी नाव : Brahminy Kite**

**ओळख** : मोरघा आकाशात दिसतो आणि मोठ्या झाडावर बसतो. उंच आकाशात उडतो.

**खाद्य** : मोरघा कोंबड्या आणि कोंबड्यांची पिल्ले खातो. शेटल्या आणि उंदीर खातो.

**कुठे राहतो/कुठे दिसतो:** झाडावर आणि आकाशात दिसतो. त्याचा रंग चॉकलेटी राहतो आणि त्याची शेपटी छोटी राहते.

**इतर काही** :-मोरघा सापाला पायाखाली धरतो आणि आकाशावर नेऊन वरून सोडून देतो आणि खायला जातो. त्याचे डोळे फार बेस राहतात.



(दपून- लपून)

स्थानिक नाव : तितिर
मराठी नाव : चितूर
इंग्रजी नाव : Grey Francolin

**ओळख :** तितिर कोंबडी सारखा असतो. त्यांचा रंग मातेरी असतो. पिसांवर काळ्या रेषा असतात. त्याची चोच आखुडीच असते. त्याचा खोपा तो झाडावर करत नाही, खालीच करतो. खोपा काड्यांचा, वाळेल गवताचा असतो. त्याला जास्त उंच उडता येत नाही. पळत सुटतो, दपून हाणला तरच त्याला पकडता येतो.

**खाद्य :** अळ्या खातो, टोळ्या खातो, किडे खातो. शेटल्या भेटला तर शेटल्या खातो. जे भेटेल गवतात ते खातो.

**कुठे राहतो/कुठे दिसतो:** जंगलात राहतो. तो झाडांवर जास्त राहत नाही. तो खालीच दिसतो.



**स्थानिक नाव : गोलफा**
**मराठी नाव : चाष (निळकंठ)**
**इंग्रजी नाव : Indian Roller**

**ओळख :** हा साळुंखी एवढा राहतो. त्याच्या पोटाला केसरी आणि पाठीवर काळासर, मातेरी असतो. त्याची चोच थोडी बारीक असते. त्यांची अंडी तीन-चार असतात.

**खाद्य :** खायला कीटक खातो, पायरीची फळं, अळया, टोळया, वडाचं फळ खातो.

**कुठे राहतो/कुठे दिसतो:** सादडीवर असतो. त्याचा खोपापण असतो सादडीवर. खोपा गवताचा असतो.

( पायर :फायकस-वड / पिंपळ वर्गातील एक वृक्ष )



**स्थानिक नाव : काकणघार**

**मराठी नाव : काळा आवाक**

**इंग्रजी नाव : Red naped ibis**

**ओळख :** रंग काळा. डोक्यावर लालसर. उंच मान आणि उंच पाय असतात. चोच टोकदार असते. पाय लाल असतात. तो उडल्यावर फार मोठा दिसतो. हेदीच्या झाडावर दिसला आम्हाला एकदा. असा कुठे बसला तर थोडा बारीक दिसतो.

**खाद्य :** मेलेला बैल, कुत्रा आणि मांजर वगैरे खातो. काही मासे मेलेले असतात ते खातो.

**कुठे राहतो/कुठे दिसतो:** काकणघार पाण्याजवळ दिसते. ती नदीजवळच्या काठावर गवतात घरटे करते. घरटे गवत व काड्या टाकून तयार करते.

**इतर काही :**-त्यांचा खोपा चांगला राहत नाही. त्यांची अंडी मोठी असतात. या पक्ष्याची शिकार केली जात नाही. हा देवाचा पक्षी कधी आहे असं बोललं जातं. लोक त्यांना त्रास देत नाहीत. जिथे रोगराई राहत नाही तिथेच हा दिसतो.



**स्थानिक नावः कुवा**

**मराठी नाव : पांढ-या छातीची पाण कोंबडी**

**इंग्रजी नाव : White breasted Waterhen**

**ओळख :** कुवा थोडा मातेरी राहतो.

**खाद्य :** अळया टोळ्या खातो

**कुठे राहतो/कुठे दिसतोः** जंगलात राहतो. झाडांवर राहतो. कुव्याचे घरटे गवतात किंवा भातलावणी केलेली असेल तिकडे असते.

**इतर काही :**-त्याची पिल्ले अंड्यातून निघाली की लगेच चालायला लागतात. ती खूपच चपळ असतात. आपण त्याचा आवाज काढला की तो जवळ येतो. त्याला रात्रीचे बोलायला लावायचं. कुवा बेस खोपा नाही बनवत, काड्याच नुस्त्या ठेवतो.



**स्थानिक नाव : पाणकोंबडी**
**मराठी नाव : करढोक**
**इंग्रजी नाव : Little Cormorant**

**ओळख :** पाणकोंबडीचा रंग काळा असतो. त्यांची चोच लांब असते आणि त्याच्या चोचीचा रंग काळा असतो.

**खाद्य :** पाणकोंबडी मासे खातो.

**कुठे राहतो/कुठे दिसतो:** पाणकोंबडी बंधा-याच्या किना-यावर गवतात खोपा करतो. त्यांचा खोपा गोल असतो आणि तो आम्हाला पाण्यात दिसतो.

**इतर काही :** आम्ही त्यांची शिकार गलोलीने करतो. पाणकोंबडीला भूजून-शिजवून त्यांचा मांस खातात.



**स्थानिक नाव : लोणबगळा**
**मराठी नाव : वंचक**
**इंग्रजी नाव : Pond Heron**

**ओळख** : मातीच्या रंगाचा असल्याने तो खाली बसला तर दिसत नाही. अख्खा मातेरीच दिसतो आणि त्याचे पंख सफेद राहतात.

**खाद्य** : बंधायावरले मासे, अळ्या, टोळ्या खातो. जिथे पाणी आटले तिथले मासे खातो.

**कुठे राहतो/कुठे दिसतो**: जंगलात राहतो. झाडांवर राहतो. कुव्याचे घरटे गवतात किंवा भातलावणी केलेली असेल तिकडे असते.

**इतर काही** : तो उडला की त्याच्या पाठीवरचा रंग दिसतो. जर उडताना आपण बघितला, एखाद्या झाडावर बसला तर तो दिसतो. उडताना त्याच्यावरुन नजर सरकली तर तो आपल्याला दिसणार नाही. हा चवीला माश्यासारखाच लागतो.



**स्थानिक नावः ठक**
**मराठी नाव : सातभाई**
**इंग्रजी नाव : Jungle babbler**

**ओळख :** ठक हा छोटा पक्षी असतो. हा हेदीच्या झाडावर राहतो आणि पिंपळाच्या झाडांवर राहतो. उंबराच्याही झाडावर राहतो.'चू' 'चू' असा आवाज करतो.

**खाद्य :** अळ्या टोळ खातो. पिंपळाची पानं खातो. उंबराची फळं खातो.

**कुठे राहतो/कुठे दिसतोः** तो सकाळीच बांबूच्या, करवंदीच्या जाळीवर असतो आणि त्याचा बोरीच्या झाडांवर खोपा असतो.

**इतर काही :** पानं दुमडून गवतानी शिवून घरटा तयार करतो



स्थानिक नाव : काकड
कुंभा-या
मराठी नाव : भारद्वाज
इंग्रजी नाव : Greater coucal

**ओळख :** त्याच्या पंखाच्या टोकाला लाल रंग राहतो. शेपटी लांब राहते.

**खाद्य :** साप, शेटल्या, अळ्या, टोळ खातो.

**कुठे राहतो/कुठे दिसतो:** जंगलात दिसतो. कडेत राहतो.

**इतर काही :** तो चढणीला लगेच भंगतो आणि समजा त्याने इसावा केला तर तो आपल्याला भंगवतो. तो डोंगराच्या टीगीला चढला तर तो त्याला पळायला सोपं पडतं. कारण तिथं हवा जास्त राहते. म्हणून त्याला डोंगरीला जास्त चढू नाही द्यायचा.

( भंगणे- दमणे, टिगीला- टोकाला)



**स्थानिक नाव :** **सुतार**
**मराठी नाव :** **मराठा सुतार**
**इंग्रजी नाव :** **Mahratta Woodpecker**

**ओळख :** सुतार पक्ष्याच्या चोचीचा रंग पिवळा असतो. तु-याचा रंग लाल असतो. पंखाला पांढरा रंग असतो आणि बाकीच्या अंगाला काळा रंग असतो.

**खाद्य :** टोळ, अळी, गवत खातो.

**कुठे राहतो/कुठे दिसतो:** कोणत्याही झाडांवर राहतो. शेतावर दिसतो. सागावर आणि सादडीवर दिसतो.

**इतर काही :** सुतारपक्षी झाडांवर चोचीने टोचतो तर त्याचा आवाज 'ठक' 'ठक' असा येतो. सुतारपक्षी आम्हाला बघायला आवडतो.



**स्थानिक नाव : होली**
**मराठी नाव : ठिपक्याचे कबुतर**
**इंग्रजी नाव : Spotted Dove**

**ओळख :** काळसर मातेरी रंगाचा राहतो. त्याची चोच बारीक राहते आणि तो कबुतरासारखा दिसतो.

**खाद्य :** अळ्याटोळ खातो. दाणे आणि मातीतले सफेद कण खातो.

**कुठे राहतो/कुठे दिसतो:** झाडावर आणि शिदाच्या झाडांवर असतो. माळात दिसतो आणि झाडांवर असतो. त्यांचा खोपा गोल असतो नि गवताचा असतो. पण खोपा चांगला नाही बनवत.

**इतर काही :** आम्ही त्याला रोज जाऊन पकडायचा प्रयत्न करतो.



स्थानिक नाव: शिरसोट
मराठी नाव : चश्मेवाला
इंग्रजी नाव : Oriental white eye

**ओळख :** शिरसोट तांबडा राहतो. नर तांबडा मादी पिवळी असे दोन प्रकार राहतात. पाय काळे राहतात. त्याची शेपटी लांब राहते. डोळे तांबडे राहतात. चोच काळी राहते. चार इंच एवढा राहतो.

**खाद्य :** अळ्याटोळ खातो.

**कुठे राहतो/कुठे दिसतो:** काजूच्या झाडावर असतो आणि खोपा बारका असतो. खोपा गवताच्या काड्या आणि मातीचा असतो.



**स्थानिक नावः काळीचूही**
**मराठी नाव : सूर्यपक्षी**
**इंग्रजी नाव : Sunbird**

**ओळख :** काळीचूहीचा रंग सर्वजागी काळा राहतो. काळीचूहीची चोच जास्त लांब सुईसारखी असते.

**खाद्य :** काळीचूही टोळ खाते. पळस, सावरी, पांगरी या फुलांचा रस खाते.

**कुठे राहतो/कुठे दिसतोः** काळीचूही जंगलामध्ये राहते.



**स्थानिक नावः काच्या**
**मराठी नाव : राखी खाटीक**
**इंग्रजी नाव : Shrike**

**ओळख :** काच्या मातेरी, ढवळ्या रंगाचा राहतो. त्यांचा रंग सफेद सारखा आणि केसरी थोडासा राहतो. त्याची शेपूट लांब असते शेपटीला दोन लांब पिसं असतात. त्याची चोच छोटी राहते. त्याच्या पायाची नखे तो मारतो. तो खाली पडला तरीपण जिवंत राहतो. आपल्या हातात पकडल्यावर त्याची नखे हातात रुततात. तो लवकर मरत नाही.

**खाद्य :** टोळ्या, अळ्या, गांडुळे, कीटक खातो.

**कुठे राहतो/कुठे दिसतोः** जंगलात राहतो आणि पाण्याच्या ठिकाणी दिसतो. धवळ्या चिंचेवर दिसतो. काच्या वायरीवर असतो. त्याचा खोपा बोरीवर असतो. आणि तुरीच्या काठ्यांवर राहतो.

**इतर काही :** तो चोहकतो. तो जर चोहकला की रगत निघतं. धरला की सोडवायला पाहतो. काच्या, मोरघा, शिक्रा अख्खांची नखं लागतात. आम्ही एकदा जंगलात शिकार करायला गेलो. आम्ही त्याला मारला आणि घरी घेऊन आलो. विस्तव पेटवली आणि पाखराला भुजला. चुलीवर टोपशी ठेवली. त्याच्यात मीठ मसाला तिखट जास्त टाकलं, मग आम्ही खाल्लं.

चोहकतो- चोच मारतो



**स्थानिक नाव : हळदकुडा**
**मराठी नाव : कालशिर्ष कांचन**
**इंग्रजी नाव : Black hooded oriole**

**ओळख :** गळा छातीच्या वरचा भाग काळ्या कुळकुळीत रंगात असतात.

**खाद्य :** वडाची व पिंपळाची फळे खातो, अळ्या व टोळ खातो. फुलामधला मध खातो..

**कुठे राहतो/कुठे दिसतो:** सादडीच्या झाडावर व कोडीच्या झाडांवर दिसतो. कोडीच्या झाडाला लांब शेंगा राहतात. त्याचा आतून धवळा चीक निघतो. त्याचे घरटे घनदाट झाडाच्या फांद्यांवर असते. घरटे वाळलेल्या गवतापासून आणि शितोड्याच्या जाळ्यापासून विणलेले असते.

**इतर काही :** हा पक्षी झाडावर एकटा किंवा जोडीने दिसतो. एकमेकांत बोलण्यासाठी शिट्टी सारखा आवाज काढतो.



**स्थानिक नाव : फेसा**
**मराठी नाव : लालबुड्या बुलबुल**
**इंग्रजी नाव : Red Vented Bulbul**

**ओळख :** पक्ष्याचा रंग काळसर असतो. काळ्या डोक्यावर झाडणीवजा तुरा असतो. पाठीवर आणि छातीवर पंख्यासारख्या खुणा असतात. शेपटीच्या बुडाशी ते स्पष्ट दिसते.

**खाद्य :** पहिल्या पावसानंतर जमिनीतल्या भोकामधून बाहेर उडू लागणारे पंखवाले कीटक हा पक्षी टिपतो.

**कुठे राहतो/कुठे दिसतो:** उन्हाळ्यात हिवाळ्यात दिसतो आणि खळ्यावर दिसतो. पाणी पिताना दिसतो.

**इतर काही :** एक एक काडी जमा करतो आणि सगळे गोळा करुन खोपा बनवतो. खोपा बनवल्यावर तो त्यात अंडी टाकतो आणि मग पिले काढतो.



**स्थानिक नावः होली**

**मराठी नाव : तांबड्या होला**

**इंग्रजी नाव : Red collared dove**

**ओळख** :होली मातेरी रंगाचा राहतो आणि पाठीला काळा राहतो. चोच काळी राहते. पोटाला थोडसा सफेद राहतो. साळुंखीपेक्षा आकाराने थोडा मोठा असा हा पक्षी असतो.

**खाद्य** : भाताचे दाणे, धान्य

**कुठे राहतो/कुठे दिसतो**: उंबरावर, पायरीवर, सादडीवर, करवंदी

**इतर काही** : करवंदीत सादडीवर खोपा राहतो. त्या खोप्यात दोन अंडी राहतात. होली काड्यांचा खोपा बनवतात.



**स्थानिक नाव: पानशिव्या**
**मराठी नाव : शिंपी**
**इंग्रजी नाव : Tailorbird**

**ओळख :** राखी रंगाचा खालून पिवळा पांढ-या रंगाचा असतो. शेपटी लांब. दोन पिसे वर आलेली असतात. शेपटी नेहमी वर उचलल्यासारखी ठेवतो. 'पीचीव' 'पीचीव' असा आवाज काढतो.

**खाद्य :** कीटक आणि अळ्या, फुलातील मध

**कुठे राहतो/कुठे दिसतो:** नेहमी झुडुपांच्या आडोशाने असते. पावसाळ्याचे दिसतो.

**इतर काही :** पळसाची नाही तर सागाची पाने एकावर एक पाने गुंडाळून द्रोण करतो. मुहाचा नाहीतर करवंदीचा चिक घेतो. एखाद शितोड्याच्या घराचा सूत घेऊन, इकडून तिकडून ती शिवत जातो आणि घरटे तयार करतो. त्याचे घरटे तो खालून बंद करतो व वरच्या बाजूने खुले ठेवतो.

शितोडा- कोळी



**स्थानिक नावः हिरवा होली / हारुड**

**मराठी नाव : हरितालक**

**इंग्रजी नाव : Yellow Footed Green Pigeon**

**ओळख :** याच्या पाठीला हिरवा रंग असतो. थोडासा पिवळा राहतो आणि चोच बारीक काळी असते.

**खाद्य :** होली अळ्याटोळ्या खातो.

**कुठे राहतो/कुठे दिसतोः** होली सादडीवर दिसतो आणि तुरीतपण दिसतो.

**इतर काही :** होलीला डोक्याला हाणला तरच मरतो. मरताना उपडाच पडतो.



**स्थानिक नाव :** **सनकन्हुरला /कचुरला**

**मराठी नाव :** **लाल मुनिया**

**इंग्रजी नाव :** **Red Munia**

**ओळख :** हा चिमणीहून लहान पक्षी आहे. छायाचित्रांमध्ये विणीच्या हंगामात दिसणारा नर दाखवला आहे. इतर वेळी नर व मादी दोघेही सारखीच दिसतात. तपकिरी रंगाचा, पाठीवर बारीक पांढरे ठिपके व किरमिरी रंगाची चोच आणि बुड असते.

**खाद्य :** कचुरला अळ्या टोळ्या खातो आणि किडे खातो.

**कुठे राहतो/कुठे दिसतो:** झुडपात खोपा करून राहतो

**इतर काही :** याचा खोपा निंबोणीवर राहतो. एका वेळी हा ७-८ अंडी घालतो. बोरीवर जास्त दिसतो. भाताचा, गवताचा खोपा बनवतो.  हा पावसाळ्यात खोपा बनवतो.



**स्थानिक नाव :** **घरधिंडळ्या**
**मराठी नाव :** **खंड्या**
**इंग्रजी नाव :** **Kingfisher**

**ओळख :** याचा रंग निळा आणि हिरवा असतो. चिमणीपेक्षा मोठा असतो. पाण्यातून फुर्रर सुसाट पळतो. शेपूट आखूड राहते.

**खाद्य :** सूर मारून मासे पकडतो. मासे खातो, छोट्या बेडक्या पण खातो. हवेतले कीडे खातो.

**कुठे राहतो/कुठे दिसतो:** पाण्याच्या जवळ

**इतर काही :** झाडाच्या फांदीवर बसून पाण्यातील मासे बघतो आणि सूर मारून पकडतो. नदीच्या काठावर बीळ खणतो व त्यात घरटे तयार करतो.



**स्थानिक नाव :** **दुडा**
**मराठी नाव :** **घुबड**
**इंग्रजी नाव :** **Spotted Owl**

**ओळख :** हे पाखरू साळुंकी पेक्षा मोठे राहते. त्याचा रंग राखाडी राहतो. तो रातचे चरायला निघतो अन् दिवसाचे त्याला चांगलं दिसत नाही. त्याची चोच बारीक अन् जरा वाकलेली टिस्कोळी राहते.

**खाद्य :** शेटल्या, कोंबडीची पिल्ले, उंदिर खातो.

**कुठे राहतो/कुठे दिसतो:** तो मोठे झाडाचे ढोनात राहतो. रातचे हिंडताना ओरडतो.

**इतर काही :** तो गाडीला आडवा गेला की अपशकुन झाला, असे सांगतात.



**स्थानिक नाव :** **आभोळी**

**मराठी नाव :** **पाकोळी**

**इंग्रजी नाव :** **Red-rumped Swallow**

**ओळख :** हा एक छोटा पक्षी आहे. तो उंच आकाशात जातो. ह्याची चोच बारीक असते. हा काळसर रंगाचा असतो.

**खाद्य :** हा अळ्या, टोळ खातो, पिस्कूटपण खातो. आणि घरावर काही वाळत घातलं असेल तर ते पण खातो, रात्रीची किडका खाते.

**कुठे राहतो/कुठे दिसतो:** ताडावर आभोळीचा खोपा राहतो. आभोळी हा खडकाच्या कोप-याला असतो, कड्यात नाहीतर दगडाच्या खाली असतो. पाऊस पडला की तो गावात घरांना असतो.

( पिस्कूट- पतंग, फुलपाखरू इ.)



**स्थानिक नाव: करकोचा**
**मराठी नाव : करकोचा**
**इंग्रजी नाव : Painted stork**

**ओळख** : उंच मान, उंच पाय,चोच टोकदार पाय लाल असतात आणि गिधाडासारखा उंच आहे.

**खाद्य** : मासे खातो

**कुठे राहतो/कुठे दिसतो**: करकोचा पाण्याजवळ दिसतो हा पक्षी नदी जवळच्या काठावर गवतामध्ये घरटे करतो. त्याचे घरटे गवत व काड्या टाकून तयार करतो.

**इतर काही** : या पक्ष्याची शिकार केली जात नाही. याला देवाचा पक्षी आहे असं बोललं जातं.

# मुलांचे अनुभव

*पयल्यांदा आमच्या वर्गात पक्ष्यांविषयी माहिती लिहिली. तो पक्षी कुठे राहतो, काय खातो, कुठे दिसतो हे सर्व आम्ही बोललो. नंतर आम्हाला पक्ष्यांचे पुस्तक दिले. त्या पुस्तकाचे नाव होते 'भारतीय पक्षी'. त्या पुस्तकात खूप काही पक्षी होते. त्यांची नवीन नवीन नावे होती. ते पुस्तक आम्हाला आवडले. त्या पुस्तकात वेगळे-वेगळी नावे होती आणि आमच्या कडे त्या पक्ष्याचे नाव वेगळेच आहे. आणि आम्हाला अधिवास म्हणजे काय माहीत नव्हता. आम्हाला पुस्तक वाचल्यावर मग कळला. मग आम्हाला नकाशा आणि दुसरे कागद दिले.*

***दिलिप युवराज विवेक -***

***दिक्षा शर्मिला विद्या दिव्या-****पहिले दिवशी नावे काढले. मुला-मुलींनी पक्ष्याचे आवाज काढून पाहिले. नंतर आम्ही पक्षी कुठे राहतात, कुठे दिसतो, काय खातो असे सर्व लिहिले. ताईनी आम्हाला पुस्तक दिले. त्या पुस्तकात वेगवेगळे पक्षी होते. त्या पुस्तकाचं नाव 'भारतीय पक्षी' होते. आम्ही टॅबवर पक्ष्याची नावे टाईप केली. ते पुस्तक आम्हाला आवडलेले.*

***जयेश, गौरव -*** *आम्ही पक्ष्यांची नावे शोधून लिहिली. आधी मनापासून लिहिली. भरपूर नावं लिहिली. ४५ नावं काढली. मी, दर्शिल, राज आम्ही जंगलात जाऊ तेव्हा ाफेसा भेटलाा असा आम्ही कागदात लिहिला.मग पुस्तकांतून पक्ष्याची माहिती शोधली. मग पक्षी नकाशात भरायचा होता. पहिल्यांदा कळलं नाही, नंतर कळला कसा करायचा. दुसरेकडचे पक्षी माहीत नव्हते, ते माहीत झाले. हिमालय, वाळवंट माहीत पडलं. हा पाखरांचा अभ्यास कठीण नाई वाटत, सोपा वाटतो. कारण पाखरां माहिती होवी म्हणून त्याचे काही विचारले की सांगता येतं. भेव नाही वाटत. असाच झाडांची विचारली तर ती ही करायला जमल. होलीचं नाव इंग्लिशमधलं सापडलं पुस्तकात तेव्हा मजा आली.*

***सुदर्शना-****पहिले आम्ही पक्ष्यांची नाव खूप काढली. नंतर पक्ष्यांचे आवाज काढले. दुसरे शुक्रवारी वर्गात आलो त्या दिवशी पक्षी कुठे राहतो, कसा दिसतो, काय खातो, कुठे दिसतो, कधी दिसतो असा लिहिला. उन्हाळा-पावसाळा-हिवाळा या पैकी कधी दिसतो, त्याचा रंग कसा असतो, कोणत्या देशात किंवा राज्यात दिसतो, काय खातो असा विचारल्यावर त्यांना अळ्या टोळ्या खायला आवडतात असा आम्ही लिहिला.*


विद्या धाकल पिलाना


विवेक भरत गडगे


दिक्षा शरद भुसारा


राज कृष्णा जाधव


शर्मिला रतन हिलीम


प्रदीप कृष्णा नडगे


दिलीप राजेश भोये


जयेश नरेंद्र अंधेर


वृंदा वसंत खुरकुटे


युवराज शंकर भोये


दिव्या महेंद्र शेंडे


प्रणल विजय तुंबडा

**“ हे पुस्तक आम्ही लिहिलंय हा पाखरांचा अभ्यास कठीण नाई वाटत, सोपा वाटतो.”**


वर्षा सुरेश घेगड


आदित्य राजेंद्र नाकरे


सुदर्शना संतोष सावर


गौरव महेंद्र नाकरा


प्रतिभा प्रकाश वाघ


आकाश रविंद्र मोहवरे


शितल सुधाकर पारधी


दर्शिल राजेंद्र टोपले


वयम्
आपल्या विकासाची आपली चळवळ